# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०४/०९/२०२२ (रविवार)

---

## जबरी चोरी करणा—या विरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— अंतर्गत मौजा कुंडी शिवार ८ किमी पुर्व. दिनांक ०२/०९/२२ चे १६/१५ वा ते १७/०० दरम्यान, यातील फिर्यादी हे आपले ड्रायव्हर राजबहादुर वर्मा याचे सह मौजा कुंडी गावाचे रोडनी शेती विकत घेण्याकरीता त्यांचे ओळखीचे इसम नामे— रमेश चव्हाण यांनी बोलविल्यावरून तेथे आले असता, त्यांची आपसात बोलचाल सुरू असता, नमुद आरोपी नामे— रमेश चव्हान यांचे ६ साथीदार अंदाजे वय ३० ते ४० वर्ष वयोगटातील हे ३ मोटर सायकल वर आले व फिर्यादी व त्यांचे ड्रायव्हरला फायबर लाठीने मारहाण करून, चाकुचा धाक दाखवुन, फिर्यादीने ड्रायव्हर जवळ ठेवलेले नगदी ५०० रू चे ४ बंडल, प्रत्येकी बंडल मध्ये १०० नोटा असलेले एकुण २,००,०००/— रू हिसकावुन आपल्या मोटर सायकलने पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नुरजहॉं मणी शेट्टी वय ४८वर्श रा.खांडी चापडा ता.शहापुर जि.ठाणे मो.नं ९८२०७००२०८ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी नामे— रमेश चव्हाण व त्यांचे ईतर ६ साथीदाराविरूध्द कलम ३९५ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री पंकज वाघोडे, मो.नं ७३०४२१०७२४ हे करीत आहे.

## अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत मौजा टेंभरी १ कि.मी. पश्चिम. यातील फिर्यादी हे सकाळी ०८/०० वा. आपल्या पत्नीसह कंपनीत कामाला गेले असता, फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ही घरी हजर होती, फिर्यादीचे वडिलाने तिला शाळेत जाण्यास सांगितले व फिर्यादी कंपनीत कामाला निघुन गेले. सायंकाळी ०६/०० वा. फिर्यादीची पत्नी कामावरून घरी परत आली असता, फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी दिसली नाही. तिचा आजुबाजुला शोध घेतला, तसेच नातेवाईकांकडे विचारपुस केली असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने दिनांक ०२/०९/२०२२ चे ०८/०० ते १७/०० वा. दरम्यान फिर्यादीचे अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एम आय डि सी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३६३ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास तपास— पोलीस उपनिरीक्षक . रामेश्वर राय पोस्टे एमआयडीसी बोरी मो.९९२३४२४७६७ हे करीत आहे.

## चोरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :– अंतर्गत मौजा वाठोडा शिवार मोहपा १२ पश्चिम. यातील फिर्यादीचे शेतातुन कोणीतरी अज्ञात चोराने लोखंडी प्लेट तारांचे दोन बंडल, लोखंडी पाईप २ नग, असा एकुण १५,०००/– चा माल दिनांक २६/८/२०२२ ते २७/८/२०२२ चे रात्री २४/०० वा. सुमारास चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पुरूषोत्तम माणिकराव रागीट वय ५९ वर्ष रा मयुर कॉम्पलेक्स दतवाडी अमरावती रोड नागपुर, यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– ए एस आय लक्ष्मन रूढे मो. नं. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

## सरकारी कामात अडथळा निर्माण करणा–या विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली** :– अंतर्गत मौजा इंदोरा ०७ कि.मी. पुर्व. यातील दिनांक ०३/०९/२२ चे ०८/०० ते ०८/३० वा. दरम्यान, यातील फिर्यादी व त्यांचेसह कर्मचारी हे मौजा इंदोरा शिवारात अवैध रेती कारवाही करत असतांना आरोपी क्र १) विवेक/शिशू मुकेशसिंग सेंगर वय २५ वर्षे २)प्रशांत/सोनू मुकेशसिंग सेंगर वय २८ वर्षे, दोन्ही रा. इंदोरा ता. मौदा जि. नागपुर यांनी आपले ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये अवैधरीत्या रेती वाहतूक करीत असतांना मिळून आल्याने फिर्यादी व सह कर्मचारी यांचे कोणतेही शासकिय आदेश नं मानता अडथळा निर्माण करून फिर्यादीस आडवे होवून, शिवीगाळ करून पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सरतर्फे सहायक पोलीस निरीक्षक नानाजी जोशी वय ३८ वर्षे पो स्टे अरोली मो. नं. ७८७५९६६६७६, यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे नमुद दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३५३, ३७९,३४१,१८६,१८८,५०४,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पोलीस निरीक्षक श्री जाधव पो. स्टे. अरोली मो. न ९८७०३२८९०४ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन रामटेक** :– अंतर्गत मौजा स्वामी विवेकानंद वार्ड रामटेक १ किमी पुर्व. यातील फिर्यादी व आरोपी एकमेकांचे घराजवळ राहत असुन दिनांक ०२/०९/२२ चे २१/३० वा. दरम्यान, यातील आरोपीचा कुत्रा हा फिर्यादीचे कुन्र्याला पाहुन भुकंत असल्याने, फिर्यादीने त्या कुन्र्याला हाकलत असता, यातील आरोपीने फिर्यादीस व फिर्यादीचे वडीला सोबत भांडण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी क्र १ याने फिर्यादीस काठीने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महेन्द्र अशोक वालदे वय ३८ वर्ष रा. स्वामी विवेकानंद वार्ड रामटेक मो.न. ७५१७७५८६८९ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी नामे– १)रामा शंकर दमाहे वय १९ वर्ष २)शंकर दमाहे वय ५२ वर्ष दोन्ही रा. स्वामी विवेकानंद वार्ड रामटेक यांचे विरूध्द कलम ३२४,५०४, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना/ योगेश भुरे पोस्टे रामटेक ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**